विनियमन) अधिनियम २०१२ ... स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

(12)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.४१/एसएम २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः १७ मार्च, २०१७

संदर्भ -

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे पत्र क्रमांक अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/३०४, दिनांक १.०२.२०१७

प्रस्तावना -

१. ज्ञानसाई प्रतिष्ठाण, हडपसर, पुणे संचलित ग्लेझिंग स्टार इंग्लिश मिडीअम स्कूल, मांजरी (बु.), ता. हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत ज्ञानसाई प्रतिष्ठाण, हडपसर, पुणे संचलित ग्लेझिंग स्टार इंग्लिश मिडीअम स्कूल, मांजरी (बु.), ता. हवेली, जि.पुणे या शाळेस (प्राथमिक, इ. १ ली ते ५ वी, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे .

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने शाळेच्या प्रस्तावित ठिकाणचा संस्थेच्या मालकीचा विहित निकषाएवढ्या जमिनीबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा/खरेदीखत किंवा जागा भाडे करारावर (लीज) असल्यास ३० वर्षे कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक

महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे

महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ **दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक), पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

अध्यक्ष
ज्ञानसाई प्रतिष्ठान
हडपसर, पुणे - २८.

Scanned by CamScanner

(63)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विदयमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र. १९४/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०८ मार्च, २०१९

प्रस्तावना -

ज्ञानसाई प्रतिष्ठान, हडपसर, पुणे संचलित व्हिनस वर्ल्ड स्कुल, मांजरी (ब्रु), ता.हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत ज्ञानसाई प्रतिष्ठान, हडपसर, पुणे संचलित व्हिनस वर्ल्ड स्कुल, मांजरी (ब्रु), ता.हवेली, जि.पुणे या शाळेस (प्राथमिकला जोडुन उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक इयत्ता ६वी ते १२वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, राज्यमंडळ) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती

(१) सदर संस्थेने अदययावत रु. २०,००० /- चे नवीन चलन, अदययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, विहीत निकषाची व मुदतीची मुदतठेव पावती व लगतच्या तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

Scanned by CamScanner

(64)

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सही) १८.०३.२०१९

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यिमक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

Scanned by CamScanner

(6)

**पुणे जिल्हा परिषद,पुणे**
यशंवत चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/ ५५/२०१८
पुणे दिनांक - १९/७ /२०१८

प्रति,

अध्यक्ष, मुख्याध्यापक
ज्ञानसाई प्रतिष्ठान हडपसर पुणे संचलित
ग्लेझिंग स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल मांजरी बु ता. हवेली

**विषय:- शाळेच्या नावात बदल करणे बाबत.**

संदर्भ:- १) शासन पत्र क्रमांक एसएसएन-१०९६/७०८८/माशि-१ मंत्रालय मुंबई-३२ दि ३/१२/१९९८
२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे -१ यांचे पत्र जाक्र/शिउस/प्राथ -द/२/नावात बदल/२०१५/४२८५/८६ दि २६/२/२०१५
३) आपले कार्यालयीन पत्र दिनांक १७/१/२०१८

उपरोक्त विषयान्वये शाळेच्या नावात बदल करणे बाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. प्रस्तावातील कागदपत्र विचारात घेवुन बदलाची नोंद या कार्यालयाच्या नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

| जुने नांव | नवीन नाव |
|---|---|
| **ग्लेझिंग स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल मांजरी बु ता. हवेली जि.पुणे** | **व्हिनस वर्ल्ड स्कूल, मांजरी बु ता. हवेली जि.पुणे** |

**शिक्षणधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा.शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग पुणे-१

# Letter Details

NO : CBSE/1131024/SS-00325-2324/2023-24/

Dated: 14/06/2022

**The Manager,**
**Venus World Schools Pune MH**
**VENUS WORLD SCHOOLS,A/P : MANJARI BK,TAL.HAVELI DIST.PUNE**
**MAHARASHTRA,PUNE, 412307**
**(M: 020-7028088103)**

**SUBJECT: - UPGRADATION TO SENIOR SECONDARY LEVEL - REGARDING.**

**Ref : Application No.: - SS-00325-2324 DATED: 04/05/2022**

Sir/Madam,

This is with reference to school application on the subject cited above. I am directed to convey the approval of the Board for Affiliation i.e Upgradation to Senior Secondary Level as per details given below :

| | |
|---|---|
| **Affiliation No used as User ID for both OASIS and LOC/Registration System** | **1131024** |
| **School No** | 22551 |
| **Affiliated for** | Senior Secondary School Examination Class 1 to 12 |
| **Category** | Upgradation of Affiliation |
| **Period of affiliation** | 01.04.2022 to 31.03.2027 |
| **Year and Month From which admission can be taken in Class-IX/XI** | 1 April,2022 |
| **Year and Month in which first batch of Class-X/XII will appear in board examinations** | 1 April,2024 |

The above sanction is subject to fulfillment of following conditions:-

1. The approval is based upon the documents /data/information uploaded by the school online. The school will be responsible for its genuineness. In case of any discrepancies, necessary action will be initiated against the school as per Affiliation Bye -Laws-2018.
2. The school will follow the RTE Act, 2009 and instructions issued thereon by the CBSE/Respective State /UT Govt. from time to time. The school will also abide by the conditions prescribed, if any, by the State Government concerned.
3. The School is required to apply on online for extension of affiliation along with the requisite fee and other documents as per Rule 10.3 of Affiliation Bye Laws.
4. The school should go through the provision of Affiliation and Examination Bye Laws and subsequent amendment therein as well as circulars and guidelines /instructions issued by the Board time to time and keep a copy there of for reference purpose and is also advised to regularly visit CBSE websites i.e., http://cbseacademic.nic.in/ & http://cbse.nic.in/ for updates.
5. The school to renew mandatory certificates from time to time.
6. The school shall be solely responsible for any legal consequences arising out of the use of school name/logo/society/trust or any other identity /activity related to running of school affiliated to CBSE. All legal expenses incurred by the Board, if any, arising out of these circumstances, shall be borne by the school.
   **"The school shall possess valid fire safety certificate and Building safety certificate during functioning of the school which shall be renewed from time to time as per norms".**

**DEPUTY SECRETARY/JOINT SECRETARY (AFF.)**

**ENROLMENT TABLE**

| SN | Location of School | Campus area | Affiliation Allowed | Optimum No. of Sections<br>(From classes I/VI to X/XII) |
|---|---|---|---|---|
| A | Areas/Cities mentioned in clause 3.6 | 1600 sqm | Up to Class-X only | 10 |
| B | Areas/Cities mentioned in clause 3.6 | 2400 sqm | Up to Class-XII | 24 |
| C | Areas/Cities mentioned in clause 3.6 | 3200 sqm | Up to Class-XII | 28 |
| D | Class-X Cities (Clauses 3.5) and<br>Areas mentioned in clause 3.7 | 2000 sqm | Up to Class-X only | 10 |
| E | Class-X Cities (Clauses 3.5) and<br>Areas mentioned in clause 3.7 | 3000 sqm | Up to Class-XII | 24 |
| F | Class-X Cities (Clause 3.5) and<br>Areas mentioned in clause 3.7 and<br>Areas/Cities mentioned in clause 3.4 | 4000 sqm | Up to Class-XII | 28 |
| G | Pan India (Clause 3.3) | 6000 sqm | Up to Class-XII | 38 |
| H | Pan India (Clause 3.2) | 8000 sqm | Up to Class-XII | 48 |
| I | Pan India (Clause 3.2) | >8000 sqm | **Up to Class-XII**<br>The number of sections shall be restricted in accordance with **'H'** above with land requirement unit scaled down to 2000 square meters i.e. 12 sections for every 2000 square meter additional land. | |
| · The total number of sections taken together for classes XI and XII should not be more than 1/3 of optimum number of section allowed on the basis of land holding for any school. | | | | |
| · The number of sections and students shall be restricted as per the actual facilities in the school. | | | | |
| · For class rooms of size less than 500 sq feet the enrolment shall be 0.08 X size of class rooms in sq feet | | | | |

**Important Notes :** 1. The school has submitted land certificate issued dt. 03.06.2022 of land area 3245 sq mtrs. Therefore, school is granted upgradation of affiliation on the land area 3245 sq mtrs. maintain the compactness of the school campus area. 2. The school must ensure Building and Fire Safety Certificate from concerned Government Department from time to time. 3. School must ensure to upload Mandatory Public Disclosure in school's website as per appendix -IX of Affiliation Bye-laws 2018 in compliance to Board's Circular No. 09/2021 dated 21.05.2021. 4. The labs equipment, reagents and specimens etc. kept in laboratories shall be in accordance with the laws, rules and regulations applicable and school is required to properly maintain/establish all labs as per norms. 5. School must ensure all the labs and classrooms as per norms and should be well maintained as per norms. 6. School is required to run the number of section as per Appendix V (Strictly) of Affiliation Bye-laws of the Board.
School is required to appoint special educator & wellness teacher as per affiliation bye laws.

*This is an electronically generated document. It does not need any signature.*

*To verify the authenticity of the document , please visit (http://www.saras.cbse.gov.in/saras/AffiliatedList/ListOfSchdirReport (http://www.saras.cbse.gov.in/saras/AffiliatedList/ListOfSchdirReport)).*

PRINT